यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

जा.क्र : पनिका/ सप्टेंबर 2025 / 1812

परिपत्रक क्र.48

दिनांक : 01.09.2025

ऑनलाईन परीक्षेसंबंधीच्या महत्वाच्या सूचना

विद्यापीठाने सप्टेंबर 2025 मध्ये G21 B.A. (Police Administration) G71/G72/G73 Value and Spiritual Education, G121,G26, G122, B.A. (Army 2020,2018 Pattern) B.Com. (Army 2020, 2018 Pattern) या शिक्षणक्रमाच्या ऑनलाईन परीक्षा आयोजित केलेल्या असून त्यांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. विद्यार्थ्याने आपल्या पेपरचा दिनांक व वेळ वेळापत्रकानुसार आधीच पाहून खात्री करावी व मगच परीक्षा द्यावी.

1. विद्यार्थ्यांची विषयनिहाय यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Examination Tab मधील सप्टेंबर 2025 (Online Exam) या Page वर उपलब्ध आहे. सदर यादीमध्ये नाव असलेले विद्यार्थीच परीक्षेसाठी पत्र असतील, त्यामुळे विद्यार्थ्यांना हॉल तिकीट उपलब्ध करून दिले जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
2. ऑनलाईन लॉगीन स्लॉट टाईम.
   1) M = Moring = सकाळी 8.00 AM To 11.00PM, 2) A = Afternoon दुपार 3.00 PM To 6.00PM परीक्षा पद्धती बहुपर्यायी प्रश्न, प्रत्यक्ष परीक्षा 60 मिनिटे वेळापत्रकातील शिक्षणक्रम सांकेतांकानुसार आपला पेपर किती तारखेला किती वाजता, कुठल्या लॉगीन स्लॉट मध्ये आहे ते पाहून विद्यार्थ्याने पुरेशा वेळ आधी परीक्षेला सुरूवात करावी. लॉगीन स्लॉट टाईम 03 तासांचा असला तरी प्रत्यक्ष **परीक्षेचा वेळ 60 मिनिटे (एक तास) आहे.** त्या कालावधीत परीक्षा संपवणे आवश्यक राहील. **विद्यार्थ्याने परीक्षेला उपलब्ध 50 प्रश्नांपैकी 40 प्रश्न 60 मिनिटांत सोडवायचे आहेत, प्रत्येक प्रश्नाला 02 गुण याप्रमाणे 50 गुणांची परीक्षा होईल.**
3. वेळापत्रकानुसार परीक्षा दोन सेशनमध्ये सकाळी (M) 08.00 ते 011.00 व दुपारी (A) 03.00 ते 05.00 या वेळेत वेळापत्रकामध्ये दर्शविल्याप्रमाणे होईल.
4. कुठल्याही कारणास्तव ऑनलाईन परीक्षा (बंद) टर्मिनेट झाल्यास (उदा- इंटरनेट कनेक्टीव्हिटी, पॉवर सप्लाय, अन्य कारणे इत्यादी) विद्यार्थ्याला दिलेल्या लॉगीन स्लॉट टाईम मध्ये पुन्हा एकदा लॉगीन होऊन परीक्षा पूर्ण करता येईल आणि त्याला त्याच्या शिल्लक वेळच पुन्हा उपलब्ध होईल. उदा एखादा विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा सुरू केल्यानंतर 10 मिनिटांतच कुठल्याही कारणाने ऑनलाईन प्रणालीतून बाहेर पडला आणि परीक्षा थांबली तर तो विद्यार्थी दिलेल्या लॉगीन स्लॉट टाईम मध्ये पुन्हा लॉगीन होक शकेल, त्याला त्याचा उरलेला वेळ 50 मिनिटे मिळेल. त्याने पूर्वी सोडविलेल्या प्रश्नांशिवाय शिल्लक प्रश्न सोडवण्यास उपलब्ध होतील.
5. विद्यार्थ्याने शक्यतो लॉग ईन स्लॉटच्या सुरुवातीस लवकर परीक्षा देण्यास सुरुवात करावी, जेणे करून जर काही तांत्रिक अडचण निर्माण झाली, तर ती अडचण सोडविण्यास पुरेसा वेळ त्या लॉग ईन स्लॉट टाईम मध्ये उपलब्ध असेल आणि विद्यार्थ्याला दिलेल्या लॉग ईन स्लॉट टाईममध्ये परीक्षा पूर्ण करता येईल.
6. विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी **http://ycmoucbt.onlineportal.org.in/** ही लिंक **Browser** मध्ये ओपन करून परीक्षा प्रणालीत प्रवेश करायचा आहे.
7. ऑनलाईन परीक्षा सुरु करणेपूर्वी विद्यार्थ्यास परीक्षेसाठी नोंदणी करावी लागेल. नोंदणी करताना त्यास प्रथम कायम नोंदणी क्रमांक (PRN) टाकावा लागेल. त्यानंतर त्याचे नाव स्क्रीनवर दिसेल. त्याचे नाव व कायम नोंदणी क्रमांक बरोबर असल्याची खात्री झाल्यानंतर विद्यार्थ्याने स्वतःची जन्मतारीख **Password** समोर

DDMMYY या पध्दतीने भरावी / ऐंटर करावी. (प्रवेश अर्ज भरतांना नोंदणी केलेली) **उदा: जन्मतारीख 05/08/1997 आहे तर Password 050897** असा भरावा. प्रत्यक्ष परीक्षा सुरु झाल्यानंतर परीक्षेचा 60 मिनिटांचा कालावधी सुरु होईल. आपण परीक्षेला लॅपटॉप अथवा डेस्कटॉप वापरणार असाल तर Login आणि USER Password वापरून लॉगीन करावे.

8. ऑनलाईन परिक्षा देण्यासाठी विद्यार्थ्याने Login करण्यासाठी आपला (कायम नोंदणी क्रमांक PRN) PRN समोर भरावा. Date of Birth समोर आपली जन्म तारीख (प्रवेश अर्ज भरतांना नोंदणी केलेली) DDMMYY ह्या स्वरूपात भरावी. PRN व Date of Birth इंग्रजीमध्ये टाकण्यात यावी. त्यानंतर Select Active Test मधून आपल्या विषयाची प्रश्नपत्रिका Select करून Login करावे.
9. Video User Manual चा वापर करावा.
10. Smart Phone करीता Google Chrome किंवा Mozilla Firefox हे Browser वापरावेत व Browser ची history, cookies आणि caches वेळोवेळी Clear कराव्यात.
11. विद्यापीठाने याच लिंकवर विद्यार्थ्यांकरीता डेमो परीक्षा (Mock Test) उपलब्ध करून दिली आहे. तरी विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी ती सोडवून सराव करावा म्हणजे प्रत्यक्ष परीक्षा देताना कोणत्याही अडचणी येणार नाहीत.
12. परीक्षेच्या कालावधीत परीक्षेसंदर्भात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विभागीय केंद्रावर तांत्रिक सहायक म्हणून काही व्यक्तीची नियुक्ती केलेली आहे. त्यांचा मोबाईल नंबर विद्यापीठाच्या पोर्टलवर देण्यात आला आहे. परीक्षेसंदर्भात अडचणीबाबत आपल्या विभागीय केंद्रातील संबंधित व्यक्तीशी संपर्क करावा, विभागीय केंद्रातील प्रत्येक संबंधित व्यक्तीचे नाव व फोन नंबर पोर्टलवर प्रसिध्द केलेले आहे, त्याचा वापर करून शंकानिरसन करून घ्यावे.
13. **परीक्षा ऑनलाईन प्रॉक्टर्ड (Proctored) पध्दतीने होतील. विद्यार्थ्याच्या प्रत्येक हालचालींवर सॉफ्टवेअरद्वारे/वेब कॅमेऱ्याद्वारे देखरेख ठेवली जाईल व आपणांस ह्यासंदर्भात वेळोवेळी सॉफ्टवेअरद्वारे वॉर्निंग देण्यात येईल. विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिकच्या वॉर्निंग आपणांस दिल्या गेल्या तर आपली परीक्षा आपोआप बंद होऊन आपणांस गैरप्रकार समितीसमोर बोलावण्यात येईल व विद्यापीठाच्या नियमांनुसार योग्य ती शिक्षा विद्यार्थ्याला दिली जाईल, याची नोंद घ्यावी.**
14. **विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पेपर सोडविताना प्रश्नाखाली असलेल्या चार पर्यायासमोर असलेल्या रेडिओ बटन दाबूनच उत्तराची निवड करावयाची आहे. पर्यायावर टिक करून उत्तर निवड होत नाही अन्यथा उत्तरे सोडविली नाही म्हणून शून्य गुण मिळतील, याची नोंद घ्यावी.**
15. **ऑनलाईन परीक्षेचा पेपर पूर्ण सोडवून झाल्यानंतरच Submit या पर्यायावर क्लिक करावे. Submit पर्यायावर चुकूनही आधी क्लिक केले गेले तरी परीक्षा संपूष्टात येईल व पुन्हा लॉगीन केल्यानंतरही सदर पेपर उपलब्ध होणार नाही. याची विद्यार्थ्याने नोंद घ्यावी.**
16. पेपर सोडविताना Clear या पर्यायाने चालू प्रश्नाचे उत्तर Clear होते. Clear या पर्यायाने आधी सोडविलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे Clear होत नाहीत.
17. वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या / बहुपर्यायी (Multiple Choice Question MCQ) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पूनर्मुल्यांकनाची सुविधा उपलब्ध होणार नाही.
18. ऑनलाईन परीक्षा व सराव परीक्षेसाठी लिंक: **http://ycmoucbt.onlineportal.org.in/** वापर करावी.

सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी मनपूर्वक हार्दिक शुभेच्छा !

(भटूप्रसाद पाटील)
परीक्षा नियंत्रक